महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । महाराष्ट्र
मंगळवार दि. १० मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३७
पान १ । पाने ४
किंमत ३ रुपये

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










# राज्यात नवीन रिक्षा परवान्यांवर बंदी!



## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय

धाराशिव । वृत्तसेवा

**राज्यात वाढती वाहतूक कोंडी आणि शहरी प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत राज्यभर ९ मार्चपासून नवीन ऑटो रिक्षा व टॅक्सी परवाने देण्यास तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला.**

परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह राज्यातील सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी उपस्थित होते.राज्यात सध्या १४ लाखांहून अधिक ऑटो रिक्षा व टॅक्सी परवाने देण्यात आलेले आहेत. वाढत्या वाहनसंख्येमुळे अनेक शहरांमध्ये वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ऑटो रिक्षा व टॅक्सी परवान्यांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार राज्य सरकारकडे आहेत. या संदर्भात परिवहन मंत्र्यांनी केंद्र सरकारशी पत्रव्यवहार केला होता. त्यानंतर केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राज्य सरकारला स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला आहे.दरम्यान, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षा ▶▶ पान २ वर

# स्थानिक गुन्हे शाखेचा मोठा छापा

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने बशीरगंज भागात एका पत्र्याच्या शेडवर धाड टाकून १ लाख ६० हजार २४० रुपये किमतीचा अवैध गुटखा जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई सोमवारी, ९ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:४५ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी शेख इरफान जब्बार याला ताब्यात घेतले असून, त्याचा साथीदार सलमान रफिक बागवान हा फरार झाला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली होती की, बशीरगंज येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये विविध कंपन्यांचा गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आला आहे. या माहितीची खातरजमा करून ▶▶ पान २ वर



## १.६० लाखांचा अवैध गुटखा जप्त

## लोखंडी रॉडने तरुणाला

# अमानुष मारहाण

बीड । प्रतिनिधी

शहरातील अंकुश नगर परिसरात एका तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला करून लोखंडी रॉडने अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात संदीप दहिफळे हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बीड शहरातील अंकुश नगर भागात संदीप दहिफळे याला तीन ते चार जणांनी अडवून त्याच्यावर अचानक हल्ला केला.आरोपींनी धारदार शस्त्राने त्याच्या पाठीवर आणि छातीवर वार केले. त्यानंतर लोखंडी रॉडने त्याला बेदम मारहाण करण्यात आली. यात हाताच्या हाडाचे तीन तुकडे झाले असून हल्ल्यात त्याच्या छाती, पोट आणि हाताला गंभीर दुखापत झालीये.जखमी संदीप दहिफळे याला तात्काळ जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्याला शहरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, या प्रकरणात वैद्यकीय कायदेशीर नोंद करण्यात ▶▶ पान २ वर

# राज ठाकरेंना मोठे गिफ्ट

मुंबई । वृत्तसेवा

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत राज्यात फारसे यश मिळाले नाही. मुंबई महापालिकेत दोन भाऊ एकत्र आले, ते सत्ता राखतील असे वाटत असताना मनसेचे उद्धव ठाकरे यांना मजबूत साथ मिळाली नाही, असे बोलले गेले. परंतु याच मनसेने मराठवाड्यात पंचायत समितीमध्ये आपला सभापती बसवत सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का दिला. लातूर जिल्ह्यातील रेणापूर पंचायत ▶▶ पान २ वर

## बीडमधील नागरी वनासाठी

# राज्य सरकारकडूनच नाही प्रस्ताव



केज । प्रतिनिधी

बीडकडे दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून पाहिले जाते, येथील दुष्काळीस्थिती बदलण्यासाठी उपाययोजना आवश्यक असून खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यातील भूजल पातळी घटणे, कमी होत चाललेले हरित क्षेत्र आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम या गंभीर विषयाबाबत अनेक प्रश्न उपस्थित करून केंद्र सरकारचे ▶▶ पान २ वर

# ३०० फूट खोल दरीत कोसळला टँकर

धारूर । प्रतिनिधी

हैदराबादहून छत्रपती संभाजीनगरकडे कच्चा माल घेऊन जाणाऱ्या एका मालवाहू टँकरला धारूर घाटातील धोकादायक वळणावर रविवारी मध्यरात्री भीषण अपघात झाला. टँकरचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि वाहन थेट ३०० फूट खोल दरीत कोसळले. दरीत कोसळताच टँकरला भीषण आग लागली, मात्र चालक महादेव बिक्कड यांनी वेळीच उडी मारल्याने त्यांचा जीव थोडक्यात वाचला. ▶▶ पान २ वर



## आयपीएस राहुल कुमार यांनी स्वीकारला

# माजलगांव ग्रामीण पोलीस ठाण्याचा पदभार

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये जिल्हा प्रात्याक्षिक प्रशिक्षणाकरिता रुजू झालेले परिविक्षाधीन भारतीय पोलीस सेवा (आयपीएस) अधिकारी राहुल कुमार यांनी आज दिनांक ९ मार्च २०२६ रोजी माजलगांव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकारी पदाचा कार्यभार अधिकृतपणे स्वीकारला आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाने दिलेल्या आदेशानुसार, राहुल कुमार हे आगामी ३० मे २०२६ पर्यंत या पोलीस ठाण्याचे कामकाज पाहणार आहेत. राहुल कुमार हे २९ डिसेंबर २०२५ रोजी बीड जिल्ह्यात प्रशिक्षणासाठी हजर झाले होते. या कालावधीत त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील विविध शाखा, कार्यालयीन कामकाज, जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे तसेच गेवराई येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील कामकाजाचा सखोल अभ्यास केला ▶▶ पान २ वर

## आ.सोळंकेंनी विधानसभेत मांडली ग्रामीण तरुणांची व्यथा

# शेती करणाऱ्या मुलांना मुली मिळेनात, लग्नासाठी मुलांनाच द्यावा लागतोय हुंडा



बीड । प्रतिनिधी

जागतिक महिला दिनाच्या औचित्यावर विधानसभेत महिला सक्षमीकरणावर चर्चा सुरू असताना माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी ग्रामीण महाराष्ट्रातील एका अत्यंत भीषण आणि ज्वलंत सामाजिक प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले. ग्रामीण भागातील शेती करणाऱ्या तरुणांना लग्नासाठी मुली मिळत नसल्याने या मुलांच्या कुटुंबांनाच आता हुंडा द्यावा लागत असल्याची धक्कादायक माहिती सोळंके यांनी दिली. या हतबलतेचा फायदा घेऊन फसवणुकीचे मोठे रॅकेट सक्रिय झाले असून सरकारने यावर तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी त्यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे केली. आमदार सोळंके यांनी मांडलेल्या व्यथेनुसार आज ग्रामीण भागातील परिस्थिती अत्यंत भयावह झाली असून प्रत्येक लहान-मोठ्या गावात ▶▶ पान २ वर

## संपादकीय

# सर्वसामान्य 'गॅस'वर


मध्य-पूर्वेतील युद्धाचा फटका भारतातील इंधन आणि गॅस पुरवठ्याला बसल्याने आता त्याची झळ थेट सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचली आहे. घरगुती स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरच्या किमती ६० रुपयांनी वाढल्या आहेत, तर व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत ११५ रुपयांनी वाढ झाली आहे. नवे दर शनिवारपासून लागू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर देशातील गॅस वितरण सुरळीत ठेवण्यासाठी गॅस कंपन्या आणि डीलर्सच्या बैठका घेतल्या जात आहेत. या बैठकीत ग्राहकांना त्रास होऊ नये आणि उपलब्ध साठ्याचा योग्य वापर व्हावा यासाठी काही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांमुळे वितरण पद्धतीत काही बदल होण्याची शक्यता आहे. संभाव्य गॅस टंचाई लक्षात घेता केंद्र सरकारने औद्योगिक आणि व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडरचा पुरवठा तात्पुरता थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान भारतामधील ऊर्जासाठ्याची स्थिती सुधारत आहे. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढणार नाहीत, अशी ग्वाही सरकारी सूत्रांनी दिली आहे. सिलिंडरचे दर शनिवारी तात्काळ लागू झाले असून वर्षभरातील ही दुसरी वाढ असल्याने विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. भारताने होर्मुझच्या सामुद्रधुनी व्यतिरिक्त अन्य स्रोतांकडून होणा-या कच्च्या तेलाच्या आयातीमध्ये १० टक्क्यांनी वाढ केली आहे. यापूर्वी कच्च्या तेलाची आयात ६० टक्के होती, ती आता ७० टक्क्यांपर्यंत वाढली आहे असे वृत्त सरकारी सूत्रांनी दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून देशात आयात होणारा एलपीजी गॅस पुरवठा खंडीत झाला. इराणकडून बंद करण्यात आलेल्या समुद्री मार्गाहूनच भारताला एलपीजीचा पुरवठा होतो. मात्र, तो मार्ग बंद असल्याने पुरवठा थांबला. दरम्यान, इराणकडून गॅस प्रकल्पांवरही हल्ला करण्यात आला. ज्यामुळे अनेक देशांनी काही दिवसांकरता प्रकल्प बंद करण्याचा निर्णय घेतला. यामुळे अनेक गॅस प्लांटमधून नव्या ऑर्डर स्वीकारणे बंद झाले असून, दोन दिवसांत व्यावसायिक गॅस पुरवठा पूर्णपणे ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. इराण-अमेरिका युद्धाचा थेट परिणाम भारतात दिसणार नाही, असे सांगितले जात होते. मात्र, आता युद्धाचा थेट परिणाम भारतीय जनतेवर होताना दिसत आहे. काही खासगी गॅस कंपन्यांचे वितरण सध्या थांबवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. टोरंटो गॅस, रिलायन्स गॅस, महेश गॅस आणि गो गॅस या कंपन्यांकडून होणारे वितरण सध्या बंद ठेवण्यात आले आहे. यासोबतच ग्राहकांनी घाबरून गॅस सिलिंडरचा अतिरिक्त साठा करू नये असेही सांगण्यात आले आहे. भारत एलपीजीचा दुस-या क्रमांकाचा आयातदार आहे. युद्धाच्या एकूणच परिस्थितीचा विचार करून, सरकारने आपत्कालीन अधिकाराचा वापर करत देशातील सर्व तेल रिफायनरी कंपन्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. कतारने एलपीजी उत्पादन थांबवल्यामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. हा धोका लक्षात घेऊन सरकारने हे आदेश जारी केले आहेत. आता रिफायनरीज प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर केवळ स्वयंपाकाचा गॅस बनवण्यासाठी करतील असे आदेशात म्हटले आहे. सरकारी अधिका-यांच्या म्हणण्यानुसार भारतातील एलपीजी दर जगातील अनेक देशांच्या तुलनेत कमी आहेत. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी, ज्यांना २०१६ पासून मोफत एलपीजी कनेक्शन मिळाले आहे, त्यांना सबसिडीनंतर १४.२ किलो सिलिंडरसाठी ६१३ रुपये भरावे लागणार आहेत. घरगुती दरवाढीला चार सदस्यांच्या कुटुंबावर दिवसाला फक्त ८० पैशांचा आणि व्यक्तीवर २० पैशांचा भार येतो. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना दरवर्षी १२ सिलिंडरवर प्रत्येकी ३०० रुपयांची अनुदान रक्कम मिळत राहणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. इराण विरोधात अमेरिका-इस्त्रायलने छेडलेल्या युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी इंधन वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यामुळे युद्ध सुरू होऊन आठ दिवस होत नाहीत तोच भारतात तीव्र इंधन टंचाई निर्माण झाली आहे. घरगुती गॅसचा तुटवडा रोखण्यासाठी केंद्र सरकारने गॅस सिलिंडरची किंमत ६० रुपयांनी वाढवली आहे. ग्राहकांना आता नव्या गॅस सिलिंडर बुकिंगसाठी किमान २१ दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. गॅस पुरवठा करणा-या कंपन्यांनी त्यांच्या डीलर्सकडून लाखो रुपयांचे ॲडव्हान्स पेमेंट मागण्यास सुरुवात केली आहे. घरगुती गॅसबरोबरच १९ किलो वजनाच्या व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीतही ११५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. मध्य पूर्वेतील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल सुमारे ९० डॉलर्सपर्यंत पोहोचल्या आहेत. त्याचा परिणाम ऊर्जा बाजारावर झाला आहे. भारतात सध्या सुमारे ३३ कोटींहून अधिक एलपीजी ग्राहक आहेत. आखाती देशातील संघर्षाचे पडसाद थेट भारतीय बाजारपेठेत आणि घराघरांत उमटू लागले आहेत. भारताच्या एकूण कच्च्या तेल आयातीपैकी ५५ टक्क्यांपेक्षा अधिक वाटा आखाती देशातून येतो. होर्मुझची सामुद्रधुनी युद्धाने प्रभावित झाल्याने इंधन पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. कच्च्या तेलाच्या किमतीत प्रति बॅरल १० डॉलरची वाढ झाल्यास भारतात महागाईचा दर ०.२५ टक्क्यांनी वाढू शकतो. भारताकडे कच्च्या तेलाचा साठा ३०-३५ दिवस पुरेल इतका असला तरी एलपीजी आणि एलएनजीचा साठा मर्यादित आहे. पुरवठा जास्त काळ खंडित राहिल्यास स्वयंपाकाच्या गॅसची मोठी टंचाई निर्माण होऊ शकते. सौदी अरेबिया, यूएई, कतार, कुवेत यासारख्या सहा आखाती देशांत सुमारे १० दशलक्ष (१ कोटी) भारतीय नागरिक काम करतात. २०२४-२५ मध्ये परदेशातील भारतीयांनी १३५ अब्ज डॉलर भारतात पाठवले होते, ज्यातील मोठा वाटा आखाती देशांचा होता. युद्धामुळे तिथले उद्योग प्रभावित झाल्यास हा पैसा येणे थांबेल. युद्धाचे लोण अरब देशांपर्यंत पसरल्यास तिथे राहणा-या भारतीयांच्या जीविताचा आणि सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनेल. मोठ्या प्रमाणावर भारतीयांना मायदेशी परतावे लागल्यास बेरोजगारीची नवी समस्या निर्माण होईल. भारताने इराणमध्ये विकसित केलेले चाबहार बंदर हे अफगाणिस्तान आणि मध्य आशियासाठी महत्त्वाचे व्यापारी द्वार आहे. अमेरिकेचे निर्बंध आणि युद्धपरिस्थितीमुळे या बंदराचे कामकाज प्रभावित झाले आहे. शेतीसाठी आवश्यक असणारी खते आणि उद्योगासाठी लागणा-या पेट्रोकेमिकल्सची आयात आखाती देशातून होते.

## गर्भलिंग तपासणी, मुलींचे संरक्षण व ग्रामीण

# महिलांच्या प्रश्नांवर आ.सुरेश धस यांची सभागृहात ठाम आवाज

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी राज्यात पुन्हा वाढू लागलेल्या गर्भलिंग तपासणीच्या प्रकारांबाबत गंभीर चिंता व्यक्त करत मुलींचे संरक्षण आणि ग्रामीण महिलांच्या प्रश्नांवर सभागृहात ठाम आवाज उठवला. सभागृहात बोलताना आ.सुरेश धस यांनी सांगितले की, समाजात स्त्री-पुरुष समानतेची चर्चा होत असली तरी प्रत्यक्षात अजूनही मुलींबाबत भेदभाव दिसून येतो. काही वर्षांपूर्वी बीड जिल्हा मध्ये १००० मुलांमागे केवळ ६२८ मुलींचे प्रमाण इतके चिंताजनक झाले होते. विशेषतः शिरूर कासार येथे हे प्रमाण अत्यंत कमी होते. त्या काळात सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या प्रयत्नांमुळे परिस्थितीत काही प्रमाणात सुधारणा झाली; मात्र आजही राज्यातील



काही भागात गर्भलिंग तपासणीचे प्रकार समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले. गर्भलिंग तपासणी रोखण्यासाठी असलेला झीश-उेपलशर्िेप रपव झीश-छर्ीरश्र ऊळरसर्पीेंळल ढशलहपळर्िींशी -लीं प्रभावीपणे राबवला जात आहे का, याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. हा कायदा अपुरा पडत असल्यास त्यात आवश्यक सुधारणा करून केंद्र सरकारकडे पाठवाव्यात, अशी मागणीही त्यांनी केली. गर्भलिंग तपासणी करून मुलींचे गर्भपात करणाऱ्या डॉक्टर, एजंट आणि संबंधित टोळ्यांवर संघटित गुन्हेगारीप्रमाणे कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी सभागृहात केली. ग्रामीण भागात मुलींचे प्रमाण कमी झाल्यामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होत असून काही ठिकाणी बाहेरच्या राज्यांतून मुली आणून फसवणुकीचे प्रकार होत असल्याची गंभीर बाबही आ.धस यांनी मांडली. याचबरोबर ग्रामीण भागातील ऊसतोड महिला कामगारांची अत्यंत कठीण परिस्थितीही त्यांनी अधोरेखित केली. अपुऱ्या आरोग्य सुविधा, कमी हिमोग्लोबिन, प्रचंड श्रम आणि गर्भारपणातही काम करण्याची वेळ येते, ही वस्तुस्थिती सरकारच्या निदर्शनास आणून देत त्यांच्या आरोग्य तपासणी, सॅनिटरी नॅपकिन उपलब्धता, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षित कामाच्या परिस्थितीसंदर्भात ठोस निर्णय घेण्याची मागणी आ.धस यांनी केली. समाजात खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करायची असेल तर मुलींचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि संपत्तीतील हक्क याबाबत ठोस पावले उचलली पाहिजेत. अनेक वेळा बहिणी स्वतःहून मालमत्तेतील हक्क सोडतात; परंतु महिलांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळाले तर समाजातील अनेक कुटुंबीय प्रश्न कमी होतील, असे मतही आ.धस यांनी व्यक्त केले. मुलींचे संरक्षण, त्यांचे सन्मानाने जगणे आणि ग्रामीण महिलांचे प्रश्न सोडवणे ही केवळ शासनाची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याची भूमिका शेवटी बोलताना आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी सभागृहात मांडली.

## पान १ वरून

### राज्यात नवीन...

व टॅक्सी परवाने कोणत्या निकषांवर द्यावेत याबाबत लवकरच निर्णय घेतला जाणार असून त्यानुसार पुढील धोरण निश्चित केले जाणार आहे.नागरिकांना अधिक सुरक्षित, सुलभ आणि दर्जेदार वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन लवकरच आवश्यक धोरणात्मक निर्णय घेणार असल्याची माहिती परिवहन विभागाकडून देण्यात आली आहे.

### स्थानिक गुन्हे...

पोलिसांनी पथकासह त्या ठिकाणी छापा टाकला असता, पांढऱ्या रंगाच्या गोण्यांमध्ये साठवलेला मोठ्या प्रमाणावर गुटखा मिळून आला. आरोपी शेख इरफान जब्बार हा फरार आरोपी सलमान बागवान याच्या सांगण्यावरून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हा साठा करून विक्री करत असल्याचे तपासात समोर आले आहे. या यशस्वी कामगिरीत पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्यासह गोविंद राख, युनुस बागवान, अंकुश वरपे, स्वाती मुंडे, अशपाक सय्यद, मनोज परजणे, बबन सलगर आणि नितीन वडमारे यांचा सहभाग होता. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

### अमानुष मारहाण...

आली असली तरी अद्याप पोलिसांत गुन्हा दाखल झालेला नाही. संबंधित आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जखमी तरुणाच्या वडिलांनी केली आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पुढील तपास सुरू आहे.

### शेती करणाऱ्या मुलांना...

२५ ते ३० वयोगटातील किमान ५० ते १०० तरुण असे आहेत ज्यांचे शेती व्यवसायामुळे लग्न जमणे कठीण झाले आहे. आजच्या काळात ग्रामीण भागात शेती करणाऱ्या मुलाला मुलगी द्यायला कोणीही तयार नसल्याने एक गंभीर सामाजिक दरी निर्माण होत आहे. या टंचाईमुळे पूर्वी मुलींकडून घेतला जाणारा हुंडा आता मुलांना द्यावा लागत असून त्यातूनच फसवणुकीचे जाळे विणले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'बोगस मुली' आणून त्यांचे विवाह लावून देण्याचे आणि अडीच-तीन लाख रुपये लुटण्याचे प्रकार सर्रास घडत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. एकाच मुलीचे चार-चार वेळा विवाह लावून तरुणांची फसवणूक केली जात असल्याने ग्रामीण भागातील तरुण नैराश्यातून व्यसनांच्या आहारी जात असल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले. या गंभीर प्रश्नाची दखल घेत राज्य सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला आहे. राज्यमंत्री पंकज भोयर यांनी स्पष्ट केले की आमदार प्रकाश सोळंके यांनी मांडलेली परिस्थिती ही अत्यंत वास्तववादी आहे. शासन या बाबीची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित परिस्थितीचा सखोल अभ्यास करेल आणि यावर आवश्यक त्या उपाययोजना व विशेष योजना आखण्याबाबत विचार केला जाईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

### ३०० फूट खोल...

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच १४ जे ४६०० क्रमांकाचा टँकर आपला प्रवास पूर्ण करत असताना धारूर घाटातील एका तीव्र वळणावर पोहोचला. तिथे अचानक ब्रेक निकामी झाल्याने टँकर नियंत्रणाबाहेर गेला. प्रसंगावधान राखून चालकाने टँकरमधून उडी घेतली, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवले, मात्र दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत टँकरमधून धुराचे लोट निघत होते. जखमी चालकावर केज येथील रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. धारूर घाट सध्या वाहनचालकांसाठी 'मृत्यूचा सापळा' ठरत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मागील एका वर्षात या घाटात ट्रक आणि टँकर दरीत कोसळण्याच्या किमान पाच ते सहा घटना घडल्या आहेत. वारंवार होणाऱ्या या अपघातांमुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या घाटाचे तातडीने रुंदीकरण करावे आणि सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी अनेक दिवसांपासून केली जात आहे. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही प्रभावी पावले उचलली न गेल्याने भविष्यात अधिक गंभीर दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.

### राज्य सरकारकडूनच...

लक्ष वेधले होते. दरम्यान, त्यांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत केंद्र सरकारने उत्तर दिले असून यात नागरी वनांसाठी राज्य सरकारनेच प्रस्तावच दिलेला नाही, असा खुलासा केला आहे. यामुळे राज्यसरकारचा कारभार चव्हाट्यावर आलेला आहे. बीडचे खा.बजरंग मनोहर सोनवणे यांनी लोकसभेत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तार देताना पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाचे राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह यांनी म्हटले, देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये पाण्याची टंचाई, मर्यादित हरित क्षेत्र आणि हवामानातील बदल यांसारखी पर्यावरणीय आव्हाने दिसून येतात. या समस्यांवर मात करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांकडून विविध वृक्षारोपण तसेच पर्यावरणीय पुनर्स्थापना कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांमुळे हरित क्षेत्र वाढण्यास मदत होत असून पर्यावरणीय आव्हानांचे परिणाम कमी करण्यास हातभार लागत आहे. मंत्रालयाकडून 'नगर वन योजना' राबविण्यात येत असून शहरांमध्ये नागरी वनांची निर्मिती व विकास करण्यासाठी ही योजना लागू आहे. राज्यांचे वन विभाग, महानगरपालिका, नगरपालिका तसेच इतर शहरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या माध्यमातून या योजनेची अंमलबजावणी केली जाते. या योजनेसाठी राष्ट्रीय प्रतिपूरक वनीकरण निधीमधून आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेचा मुख्य उद्देश शहरांमध्ये हरित क्षेत्र वाढविणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे तसेच नागरिकांना पर्यावरणीय, शैक्षणिक आणि मनोरंजनात्मक

## पान १ वरून

लाभ उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, बीड जिल्ह्यात नागरी वन उभारणीसाठी महाराष्ट्र शासनाकडून अद्याप कोणताही प्रस्ताव केंद्र सरकारकडे प्राप्त झालेला नसल्याची माहिती राज्यमंत्र्यानी दिली. राज्य सरकारकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास, उपलब्ध जमीन आणि निधीच्या आधारे योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यावर विचार केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. खा.बजरंग सोनवणे हे बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने लोकसभेत आवाज उठवत असल्याचे वारंवार दिसत आहे. * बीडला नाही विशेष प्राध्यान्य : पर्यावरणीय समतोल राखणे, पावसाचे प्रमाण वाढविणे आणि जलसंवर्धन या बाबी लक्षात घेऊन बीड जिल्ह्याला विशेष प्राधान्य श्रेणीत समाविष्ट करण्यासाठी सध्या या मंत्रालयाकडे कोणतीही स्वतंत्र योजना उपलब्ध नसल्याचेही सरकारने स्पष्ट केले. * प्रस्ताव दिल्यास बीडला फायदा: दरम्यान, बीड जिल्ह्यात हरित क्षेत्र वाढविणे, पर्यावरणीय समतोल राखणे आणि जलसंवर्धनाच्या दृष्टीने भविष्यात राज्य शासनाने प्रस्ताव सादर केल्यास केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून त्याचा विचार केला जाऊ शकतो, असेही संकेत या उत्तरातून मिळाले आहेत.* खा.सोनवणे यांचे असे होते प्रश्न : -महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा असून येथे भूजल पातळी घटणे, कमी हरित आच्छादन आणि हवामान बदलाचे प्रतिकूल परिणाम गंभीर स्वरूपात दिसून येत आहेत, याची सरकारला माहिती आहे का? -नगर वन योजना अंतर्गत बीड जिल्ह्यात आतापर्यंत किती शहरी वनांना मंजुरी देण्यात आली आहे, विकसित करण्यात आले आहे किंवा प्रस्तावित आहेत?.-अशा मंजूर किंवा प्रस्तावित शहरी वनांचे ठिकाणनिहाय तपशील, त्यांची सध्याची प्रगती आणि पूर्ण होण्याची संभाव्य कालमर्यादा काय आहे?. -पर्यावरणीय समतोल, पर्जन्यमान वाढ आणि जलसंधारण लक्षात घेऊन बीड जिल्ह्याला विशेष प्राधान्य श्रेणीत समाविष्ट करण्याचा सरकारचा विचार आहे का?

### माजलगांव ग्रामीण...

आहे. पोलीस स्टेशनच्या प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने त्यांच्याकडे ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या नवीन नियुक्तीमुळे माजलगांव ग्रामीण पोलीस ठाण्याचे तात्कालीन पोलीस निरीक्षक बालक कोळी यांना नमूद कालावधीसाठी नियंत्रण कक्ष, बीड येथे संलग्न करण्यात आले आहे. पदभार स्वीकारल्यानंतर राहुल कुमार यांनी तातडीने कामाला सुरुवात केली असून प्रशासकीय पारदर्शकता आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याला आपले प्राधान्य असल्याचे संकेत दिले आहेत. नागरिकांना त्यांच्याशी संपर्क साधण्यासाठी ९५६०७१७१४४ आणि ९२२५०९२८३० हे भ्रमणध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

### राज ठाकरेंना...

समितीच्या सभापती, उपसभापती पदाच्या निवडीसाठी भाजपा-मनसेमध्ये युती झाली आणि हा चमत्कार घडला. विशेष म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेना (चछड) आपला २० वा वर्धापनदिन साजरा करत असताना हे घडल्यामुळे पक्षासाठी आणि राज ठाकरे यांच्यासाठी हे सरप्राईज गिफ्ट ठरले आहे. मनसे-भाजप युतीच्या माध्यमातून पंचायत समितीवर सत्ता स्थापन करण्यात मनसेला यश मिळाले आहे. सभापतीपद मनसेच्या वाट्याला आले असून येथे थेट सत्ता स्थापन केली आहे. लातूर जिल्ह्यात पहिल्यांदाच पंचायत समितीवर मनसेचा झेंडा फडकला आहे. रेणापूर पंचायत समितीच्या एकूण आठ जागांपैकी काँग्रेसने तीन, भाजपाने (इगझ) तीन तर मनसेने दोन जागा जिंकल्या होत्या. त्यामुळे, सत्तास्थापनेत मनसेची भूमिका निर्णायक ठरणार होती. किंगमेकरच्या भूमिकेत असलेल्या मनसेने थेट सभापती पदच पटकावले. पंचायत समितीचे सभापतीपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव आहे. त्यानुसार, सोमवारी समिती सभापती पदासाठीची निवड प्रक्रिया पार पडली. मनसेच्या मोनिका सूर्यवंशी यांची सभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर भाजपचे शरद दरेकर हे उपसभापती झाले. लातूर ग्रामीणचे भाजप आमदार रमेश कराड यांनी या निवडणुकीत प्रतिष्ठा पणाला लावली होती.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# निलजगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर तुर्काबाद (गंगापूर) येथेही विभागीय आयुक्त यांची भेट

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान टप्पा क्र. १ अंतर्गत पैठण तालुक्यातील महसूल मंडळ निलजगाव येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराला विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी यावेळी नागरिकांशी संवाद साधला.



यावेळी उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार, गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, भूमी अभिलेख उपअधीक्षक भास्कर खरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नायब तहसीलदार, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच कृषी सहायक उपस्थित होते.नागरिकांशी थेट संवाद साधत शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली तसेच नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले. शिबिरात नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि विविध अर्ज स्वीकृतीसाठी एक खिडकी योजना प्रभावीपणे राबविण्यात आली. या शिबिरात एकूण ७४ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ७ अर्ज जागेवरच निकाली काढण्यात आले, तर उर्वरित अर्ज पुढील कार्यवाहीसाठी संबंधित विभागांकडे वर्ग करण्यात आले. तसेच विविध विभागांच्या माध्यमातून नागरिकांना आवश्यक प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

ई-फेरफार अंतर्गत प्राप्त सर्व फेरफार अर्ज निकाली काढण्यात आल्याची माहिती तहसीलदार ज्योती पवार यांनी दिली. या शिबिरात ग्रामपंचायत, कृषी, भूमी अभिलेख, आरोग्य विभाग, सेतू सुविधा केंद्र, बचत गट, अनुलोम विभाग तसेच तहसील कार्यालय व पंचायत समितीच्या विविध विभागांचा सहभाग होता. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देत अर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. महसूल मंडळ निलजगावच्या मंडळ अधिकारी भारती मादनकर यांनी मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व संबंधित विभागांच्या सहकार्याने शिबिराचे सुयोग्य नियोजन केले. प्रशासनाचा समन्वय आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान टप्पा क्र. १ अंतर्गत निलजगाव येथील हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडल्याची माहिती उपविभागीय अधिकारी नीलम बाफना यांनी दिली. दरम्यान, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी तुर्काबाद (गंगापूर) येथेही भेट देत महसूल विभागात गेल्या काही वर्षांत आणि चालू वर्षात करण्यात आलेल्या विविध सुधारणांबाबत माहिती दिली. तसेच शिबिराच्या ठिकाणी उपस्थित नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन काही समस्यांचे जागेवरच निराकरण करण्यात आले.

## एसबीआय फाउंडेशन आणि दिलासा संस्थेने बदल घडविला: हिंगणी येथे ॲड.राजेश शिंदे यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एसबीआय फाउंडेशन आणि दिलासा संस्थेने राबवलेल्या विविध उपक्रमांमुळे हिंगणी बुद्रुक गावाच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली आहे. त्यांनी केलेली चिरंतन विकासकामे पाहून आम्ही भारावून गेलो आहोत, असे प्रतिपादन ॲड. राजेश शिंदे यांनी केले.

धारूर तालुक्यातील हिंगणी बुद्रुक येथे एसबीआय फाउंडेशन आणि दिलासा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ८ मार्च) जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी अध्यक्ष स्थानावरुन ॲड. राजेश शिंदे बोलत होते. या कार्यक्रमाला सरपंच योगेश सोळंके, दैनिक पुण्यभूमीचे कार्यकारी संपादक सुनील डोंगरे, सुशीलकुमार उजगरे, समाजसेविका निकिता तिडके,



परमेश्वर गोंडे पाटील, रजनिकांत वाघमारे, विनोद जाधव आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना ॲड. शिंदे म्हणाले की, समाजाच्या विकासात महिलांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. महिला सक्षम झाल्यास कुटुंब आणि समाज दोन्ही मजबूत होतात. त्यामुळे महिलांना शिक्षण, कौशल्य आणि संधी देणे ही काळाची गरज आहे.त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांनाही संधी मिळाल्यास त्या विकासाची नवी दिशा देऊ शकतात, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी नमूद केले की, एसबीआय फाउंडेशन आणि दिलासा संस्थेच्या माध्यमातून हिंगणी बुद्रुक येथे गावाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. पाणी व्यवस्थापन, बाजार शेडची निर्मिती, शाळेला आधुनिक संगणक प्रणाली, महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम, प्रवाशांसाठी निवारा तसेच किसान भवनाची उभारणी यांसारख्या कामांमुळे गावाच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी भर पडली आहे. तसेच किसान भवनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेत मशागतीसाठी केवळ २०० रुपयांत यंत्रसामुग्री, त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळत असून पैशांची देखील बचत होत आहे. याशिवाय नागरिकांना शुद्ध पाणी देण्यासाठीही प्रभावी पाणी व्यवस्थापन राबवले जात आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गावातील महिलांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी दिलासा संस्थेचे कर्मचारी एकनाथ शिंदे, सौदागर मुंडे व अमोल बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला गावातील महिलांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

## खेड्यातून महिला सक्षमीकरण झाले पाहिजे :भाई मोहन गुंड



**बीड । प्रतिनिधी**

आहेर धानोरा येथे जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता ग्रामपंचायत स्तरावर डिजिटल पेमेंट जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा उपक्रम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात डिजिटल साक्षरता, महिला सक्षमीकरण तसेच विविध शासकीय योजनांबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी बोलताना भाई मोहन गुंड म्हणाले की, महिलांचे खरे सक्षमीकरण खेड्यापासून झाले पाहिजे. ग्रामीण भागातील महिलांना शिक्षण, डिजिटल साक्षरता आणि शासकीय योजनांची माहिती मिळाली तर त्या अधिक सक्षम व आत्मनिर्भर बनतील. त्यामुळे महिला दिनासारखे कार्यक्रम ग्रामीण भागात साजरे होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी महिलांनी डिजिटल व्यवहार, बचत गट आणि विविध योजनांचा लाभ घेऊन समाजाच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमात उपस्थितांना सुरक्षित डिजिटल व्यवहार, डिजिटल पेमेंटचे फायदे तसेच ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच राष्ट्रीयकृत बँकांच्या विविध योजना, उ मार्फत असंघटित कामगार व शेतकरी यांच्यासाठी प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, सुकन्या समृद्धी योजना तसेच महिला बचत गटांसाठी उपलब्ध असलेल्या विविध कर्ज योजनांची माहिती देण्यात आली.


यावेळी गावातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करून महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश फाटक यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय इंगोले यांनी केले. या उपक्रमामुळे गावामध्ये डिजिटल व्यवहार आणि महिला सक्षमीकरणाबाबत जागरूकता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून सीएससीचे जिल्हा व्यवस्थापक श्री. दिनेश जाधव, शेतकरी कामगार पक्षाचे मराठवाडा चिटणीस भाई मोहन गुंड आणि शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब सोळंके, अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस उपस्थित होते.

## निपाणी टाकळी येथे श्री एकनाथ षष्टी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा सोहळा

### भागवताचार्य अंगद महाराज सातपुते (शास्त्री) यांच्या मुखातून श्रीमद् भागवत कथाचे प्रवचन

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील निपाणी टाकळी येथे श्री एकनाथ षष्टी निमित्त अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा सोमवार दि. ९ मार्च २०२६ (मित्ती फाल्गुन कृ. ६, शके १९४८) रोजी प्रारंभ होणार असून सोमवार दि. १६ मार्च २०२६ (मित्ती फाल्गुन कृ. १२) रोजी सांगता होणार आहे. हा कार्यक्रम हनुमान मंदिर, निपाणी टाकळी येथे समस्त गावकरी, भजनी मंडळ व महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांसाठी भागवत कथा,



ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ, गाथा भजन व हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात भागवताचार्य अंगद महाराज सातपुते (शास्त्री) यांच्या मुखातून श्रीमद् भागवत कथाचे प्रवचन होणार आहे. तसेच श्री ह.भ.प. देविदास महाराज मुठाळ (डिग्रस) यांच्या मार्गदर्शनाखाली ज्ञानेश्वरी पारायण होईल. हरिपाठाचे नेतृत्व श्री ह.भ.प. रेवण महाराज वायभट व श्री ह.भ.प. सुमंत महाराज डाके हे करणार आहेत. गाथा भजनासाठी श्री ह.भ.प. देविदास महाराज मुनाह (हिलस) तसेच वसमत मावकरी भजनी मंडळ व महिला मंडळ सहभागी होणार आहेत.

सप्ताहादरम्यान दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि. ९ मार्च रोजी श्री ह.भ.प. बाळू महाराज मोरे, मंगळवार दि. १० मार्च रोजी श्री ह.भ.प. महंत स्वप्नील महाराज पवार, बुधवार दि. ११ मार्च रोजी युवा कीर्तनकार श्री ह.भ.प. किरण महाराज मोटे, गुरुवार दि. १२ मार्च रोजी श्री ह.भ.प. भागचंद महाराज झांजे घाटेकर, शुक्रवार दि. १३ मार्च रोजी युवाप्रेरक श्री ह.भ.प. अक्षय महाराज पिंगळे, शनिवार दि. १४ मार्च रोजी श्री ह.भ.प. आचार्य भगवंत महाराज पुरी आणि रविवार दि. १५ मार्च रोजी श्री ह.भ.प. महंत महादेव महाराज गिरी यांचे हरिकीर्तन होणार आहे.

सोमवार दि. १६ मार्च रोजी श्री ह.भ.प. तुकाराम महाराज शास्त्री यांचे सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर सामूहिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात विविध वेळेत विष्णुसहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ व गाथा भजन यांसारखे कार्यक्रम पार पडणार आहेत.

या धार्मिक सोहळ्यात सायंकाळच्या भोजनासाठी तसेच नाष्ट्यासाठी अनेक भक्तांनी अन्नदान करण्याचे संकल्प घेतले आहेत. श्री रामदास किसनराव सोळंके, श्री परमेश्वर रामेश्वर सोळंके, श्री आश्रुबा सुखदेव सोळंके, श्री संतोष रामराव सोळंके, श्री संदकिशोर गुशली सोळंके, श्री अमोल अशोकराव सोळंके, श्री लक्ष्मण श्रीपतराव सोळंके, श्री गणेश ग्यानबा लांडगे, श्री चत्रभुज रामभाऊ सोळंके आदी भक्तांनी अन्नदानाची जबाबदारी स्वीकारली आहे.

कार्यक्रमाचे व्यवस्थापन शंभुराजे प्रतिष्ठाण युवक मंडळ, निपाणी टाकळी यांच्या मार्गदर्शनाखाली समस्त गावकरी, भजनी मंडळ व महिला मंडळ यांच्या सहकार्याने करण्यात येत आहे. या सप्ताहात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी होऊन कीर्तन श्रवणाचा तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारताच्या टी-२० विश्वचषक विजयाचा आनंद अनोख्या पद्धतीने ; मातोश्री संस्थेकडून चिखला येथे शेतकऱ्यांना वृक्षवाटप

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाने नुकत्याच जिंकलेल्या टी-२० विश्वचषकाच्या (ढ२० थींश्रव र्ङीि) ऐतिहासिक विजयाचा आनंद संपूर्ण देशभरात साजरा होत आहे. याच विजयाचे औचित्य साधून 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड' यांच्या वतीने लोणार तालुक्यातील चिखला या गावात 'एक झाड एक जीवन' हे विशेष अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत गावातील शेतकऱ्यांना मोफत वृक्षवाटप करून निसर्ग संवर्धनाचा एक नवा आदर्श निर्माण करण्यात आला आहे. बीड येथील मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार घेतला आहे. टीम इंडियाने मिळवलेला विश्वचषक विजय हा देशासाठी मोठा अभिमानाचा क्षण आहे. हा आनंद केवळ जल्लोष करून साजरा करण्यापेक्षा एका विधायक कार्यातून



आणि निसर्गाच्या सानिध्यात साजरा करण्याचा अनोखा निर्णय संस्थेने घेतला. यावेळी 'एक झाड एक जीवन' या अभियानांतर्गत गावातील अनेक शेतकऱ्यांना विविध उपयुक्त वृक्षांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. वाढते तापमान आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबवण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज बनली आहे. वाटण्यात आलेली ही झाडे केवळ पर्यावरणाचे रक्षणच करणार नाहीत, तर भविष्यात शेतकऱ्यांसाठी सावली आणि उत्पन्नाचे साधन म्हणूनही फायदेशीर ठरतील, असा विश्वास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी उपस्थित संस्थेचे अभियान प्रमुख तेजस्विनी पवार, मयुरी, सायली, कोमल, व गावकरी होते.

## मांडव जाळी येथे पीर बाबा यात्रेनिमित्त जंगी कुस्ती स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

मांडव जाळी येथील ग्रामदैवत पीर बाबा यांच्या यात्रेनिमित्त प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला परिसरातील अनेक नामांकित पैलवानांनी सहभाग घेतला होता. विविध गावांतील पैलवानांमध्ये रंगलेल्या कुस्त्यांनी उपस्थित प्रेक्षकांचे चांगलेच मनोरंजन केले.

या कार्यक्रमाला शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम, नगरपरिषदेचे सभापती निजामभाई शेख, शिवसेना जिल्हा संघटक तथा देवसेना जिल्हाध्यक्ष रतन गुजर, पोलीस अधिकारी सुनील बहिरवाळ, भावी जिल्हा परिषद सदस्य देवगुडे साहेब, भावी पंचायत समिती सदस्य सपकाळ



साहेब, पहिलवान युवा नेते बबन भैया बहिरवाळ, शिवसेना उपशहर प्रमुख हनुमान बहिरवाळ, गुजर युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनुमान गुजर, बाजीराव नही राळे सर, बाळासाहेब आवारी (आबा) यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

तसेच वस्ताद तिरमक दादा बहिरवाळ, बळीराम वस्ताद, दत्ता बहिरवाळ वस्ताद, राम बहिरवाळ पैलवान, वसंत भांडणे पैलवान, युवा नेते शरद बहिरवाळ, कृषी सहाय्यक सुनील बहिरवाळ यांच्यासह गावातील अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या जंगी कुस्ती स्पर्धेमुळे मांडव जाळी येथील यात्रेला विशेष रंगत आली असून गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रम यशस्वी केला.

## मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील राजस्थानी सेवा समाज संचलित, मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते त्याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते शनिवार दि.७ मार्च रोजी संपन्न झाले. प्रजासत्ताक दिनानिमित्त क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पहिली ते चौथी या वर्गांसाठी विविध खेळ घेण्यात आले होते त्याचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी राजस्थानी सेवा समाजाचे अध्यक्ष श्री विष्णूदासजी तापडिया, प्रमुख पाहुणे सहसचिव किशोरकुमार बाहेती हे होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात



आलेल्या विविध खेळ त्यामध्ये सांघिक व वैयक्तिक खेळ घेण्यात आले. ज्यात वैयक्तिक खेळामध्ये संगीत खुर्ची, धावणे, दोरीवरिल उड्या, अडथळ्यासह धावणे या खेळांचा समावेश होता. सांघिक खेळामध्ये मुलींसाठी लंगडी व खो खो,१ ली २ री मुलांसाठी रस्सीखेच, ३ री ४ थी मुलांसाठी खो खो या खेळांचा समावेश होता. या खेळांमध्ये प्रथम द्वितीय तृतीय उत्तेजनार्थ असे बक्षीस देण्यात आले यामध्ये विद्यार्थ्यांना मेडल व प्रशस्तीपत्र देण्यात आले. या खेळांचे सुंदर असे नियोजन क्रीडा प्रमुख वैभव बियानी सर , मुळे सर व मोराळे मॅडम यांनी केले होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेचे मुख्याध्यापक श्री सोहनी सर यांनी केले. प्रस्ताविकात सांगताना सर म्हणाले भविष्यातील खेळाडू घडावेत म्हणून शाळा वेळोवेळी नवनवीन उपक्रम शाळेमध्ये घेत असते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन श्री तापडिया साहेब व बाहेती साहेब यांनी मोलाचे मार्गदर्शन यावेळी केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वैभव बियाणी सर यांनी केले तर आभार मुळे सर यांनी मानले. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सर्वांनी परिश्रम घेतले

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार दि. १० मार्च २०२६ •



*बीड : बीड मधील नामांकित व विस्वसनीय स्वराज्य अकवाचे मालक अजय भैय्या भोसले यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे.*

# योग, प्रेरणा आणि सशक्तीकरणाचा संगम

## गेवराईत नगराध्यक्षा गीता पवार यांच्या पुढाकारातून भव्य जागतिक महिला दिन सोहळा पार पडला



**गेवराई । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने गेवराई शहरात महिलांच्या सशक्तीकरणाचा प्रेरणादायी सोहळा पार पडला. शहराच्या विद्यमान नगराध्यक्षा गीता पवार यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात योग, प्रेरणा आणि आत्मविश्वासाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

धडाडीचे नेतृत्व, कष्टाळूपणा आणि प्रेमळ स्वभावामुळे शहरात वेगळी ओळख निर्माण केलेल्या गीता पवार यांनी जिजामाता योग कार्यशाळा या माध्यमातून गेवराईतील अनेक गरीब, होतकरू आणि धडपडणाऱ्या महिलांना एकत्र आणत त्यांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्य केले आहे.स्वतः योगप्रेमी असलेल्या गीता पवार यांनी शहरातील महिलांच्या आरोग्य आणि मानसिक तंदुरुस्तीसाठी अनेक वर्षांपासून विनाशुल्क योग शिबिर सुरू केले असून अनेक महिला त्याचा लाभ घेत आहेत. महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महिलांना योगाचे विशेष मार्गदर्शन मिळावे यासाठी बीड जिल्ह्यातील विख्यात तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर योगामध्ये चमकदार कामगिरी केलेल्या डॉ. राधा तांबे यांचे विशेष योग शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात डॉ. तांबे यांनी अत्यंत अवघड आणि थक्क करणारी ॲडव्हान्स योग आसने करून दाखवत उपस्थित महिलांना योगाचे महत्त्व आणि त्याचे आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम समजावूनसांगितले. त्यांच्यासादरीकरणाने उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

यावेळी गीता पवार आणि डॉ. राधा तांबे यांनी शून्यातून स्वतःचे विश्व उभे करण्याचा आपला प्रेरणादायी संघर्षमय प्रवासही महिलांसमोर मांडला. हा अनुभव ऐकताना अनेक महिला भावूक झाल्या तसेच त्यांना जीवनात पुढे जाण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली. या उपक्रमामुळे गेवराई शहरात महिलांमध्ये आत्मविश्वास, आरोग्याबाबत जागरूकता आणि एकात्मतेचा संदेश पसरला असून गीता पवार यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## थोडक्यात...

### ३१ मार्चपूर्वी प्रधानमंत्री आवास योजनेचे अर्ज भरावे : फारुख पटेल, अमर नाईकवाडे यांचे आवाहन




**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुलाचा लाभ घेण्यासाठी बीड शहरातील पात्र नागरिकांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी अर्ज भरावेत, योजनेचे पोर्टल लवकरच बंद होण्याची शक्यता असल्याने इच्छुकांनी तातडीने ऑनलाईन अर्ज करावा असे आवाहन गटनेते फारुख पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे. या योजनेसाठी अर्जदाराकडे स्वतःच्या मालकीची जागा असणे आवश्यक असून आधार कार्ड (संपूर्ण कुटुंबाचे), राष्ट्रीयकृत बँक खाते, झढठ (नगर परिषद), खरेदीखत / झठकार्ड / ७/१२ उतारा तसेच उत्पन्न प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर सर्व कागदपत्रांसह ऑफलाईन अर्ज नगर परिषद, बीड येथे जमा करणे बंधनकारक आहे. बीड शहरातील पात्र नागरिकांनी लवकरात लवकर अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन फारुख पटेल, अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

### पात्र दिव्यांगबांधवानां ११ मार्च रोजी मोफत स्कुटरची गुगल ीरपवराळीश पद्धतीने सोडत होणार :जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती मेश्राम

**बीड । प्रतिनिधी**

सन २०२५ २६ मध्ये पाच टक्के दिव्यांग कल्यानार्थ राखीव निधी मधून दिव्यांगांना मोफत तीन चाकी स्कूटर विथ अडॅप्टर चा पुरवठा करण्याची योजना बीड जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत गटविकास अधिकारी कार्यालय पंचायत समिती संबंधित यांच्याकडून २/२/२०२६ पर्यंत अर्जांची मागणी करण्यात आलेली होती. बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यामधून एकूण ११८४अर्ज प्राप्त झाले आहेत पैकी पात्र अर्जांची संख्या ७२२ आहे व अपात्र अर्जांची संख्या ४६२ आहे अपात्र अर्जामध्ये ेविळव कार्ड नसणे, उत्पन्न प्रमाणपत्र नसणे, अस्थि व्यंग प्रवर्ग सोडून इतर प्रवर्गाचे अर्ज असणे, ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र नसणे ,वय ५० वर्षात जास्त असणे, व या पूर्वी लाभ घेतलेला असणे या कारणामुळे जवळपास ४६२ अर्ज अपात्र ठरले आहेत. पात्र अर्जातून एकूण २२ तीन चाकी स्कूटरचा पुरवठा या योजनेतून करण्यात येणार असून ११ तालुक्यांसाठी प्रत्येकी २ याप्रमाणे एकूण २२ तीन चाकी स्कूटर लाभार्थ्यांना मिळणार आहेत .सदर बाबतीत पात्र अर्जांची संख्या ७२२ असल्यामुळे व उद्दिष्ट कमी असल्यामुळे सोडतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. सोडत ही सेसश्रश ीरपवराळीश पद्धतीने करण्यात येणार आहे.सदर सोडत दिनांक ११.३.२०२६ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड बीड येथे सकाळी ठीक ११.०० वाजता होणार आहे. सदर सोडतीसाठी दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहण्याचे आव्हान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री विलास जाधव व जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती एस एन मेश्राम यांनी केले आहे.

# आरटीई प्रवेशातील १ किमी अटीला न्यायालयाची स्थगिती

## पालकांना दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या २५ टक्के प्रवेशाबाबत महत्त्वाची घडामोड घडली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारने लागू केलेल्या आरटीई प्रवेशासाठीच्या १ किलोमीटर अंतराच्या अटीला स्थगिती दिली आहे.




राज्य सरकारच्या नव्या नियमानुसार आरटीई अंतर्गत प्रवेश घ्यायचा असल्यास विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून १ किलोमीटर परिसरातील शाळाच निवडण्याची अट घालण्यात आली होती. मात्र या निर्णयाला नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आलेल्या याचिकांमधून आव्हान देण्यात आले होते. या याचिकांवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने राज्य सरकारच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना म्हटले की, आरटीई कायद्यात कुठेही १ किलोमीटरची अट नमूद केलेली नाही. शिक्षणाचा हक्क कायदा हा केंद्र सरकारचा असून त्यामध्ये राज्य सरकारने अशी अट लादणे म्हणजे एका हाताने अधिकार देणे आणि दुसऱ्या हाताने तो काढून घेण्यासारखे असल्याचेही न्यायालयाने नमूद केले. याचिकेत १ किमीची अट मनमानी, अवैध आणि संविधानविरोधी असल्याचा आरोप करण्यात आला होता. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता पालकांना आपल्या मुलांसाठी आरटीई अंतर्गत कोणतीही शाळा निवडण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### निर्णयाचे स्वागत – मनोज जाधव

**दरम्यान, न्यायालयाच्या या निर्णयाचे आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी स्वागत केले आहे. या निर्णयामुळे पालकांना मोठा दिलासा मिळाला असून अर्ज दाखल करताना येणाऱ्या अडचणी दूर होतील. विशेषतः ग्रामीण भागातील पालक आणि त्यांच्या पाल्यांना या निर्णयाचा अधिक लाभ होणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.**

# जैन मंदिराच्या पाठीमागील छत्रपती कॉलनी येथे श्री शिव महापुराण कथेस प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील गयानगर जालना रोड जैन मंदिराच्या पाठीमागे छत्रपती कॉलनी येथे श्री शिव महापुराण कथेस दि.०६/३/२०२६ शुक्रवार पासून प्रारंभ झाला आहे. या कथेची सांगता दि.१२/३/२०२६ गुरूवार रोजी होणार आहे. शिव महापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.शिवाजी महाराज पवार ( मांजरसुबा ) हे कथेचे निरुपण करत आहेत.ज्ञानयज्ञ सोहळा संपन्न होत आहे. कथा वेळ दररोज दुपारी ०२ ते सायं.०५ वाजेपर्यंत होत आहे. दि.१२/०३/२०२६ शुक्रवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होईल. साथसंगत विजय महाराज जाधव, भीमराव महाराज डुबल, अरविंद मुळे हे देत आहेत. या कथेस भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक सुनील पिंपळे, प्रदीप पिंपळे, प्रमोद पिंपळे, शोभा पिंपळे, राणी पिंपळे, पांडुरंग वैद्य, छाया वैद्य यांच्यासह भजनी मंडळ चे बाबुराव राऊत, भानुदास वाघमारे, सुषमा मोहळकर, आश्रराबाई शहाणे, द्वारकाबाई चिरके, प्रयागबाई जाधव, गंगाबाई कोठेकर, भीमराव घाडगे, सरीता जाधव यांच्यासह छत्रपती कॉलनी, गयानगर, बीड यांनी केले आहे. मंगळवारी होणार शिवपार्वती विवाह: श्री शिव महापुराण कथेस दि.०६/३/२०२६ शुक्रवार पासून प्रारंभ झाला आहे. आज मंगळवारी दि. १० मार्च रोजी कथे दरम्यान ४.३० वाजता शिवपार्वती विवाह सोहळा संपन्न होणार आहे, अशी माहिती शिव महापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.शिवाजी महाराज पवार ( मांजरसुबा ) यांनी दिली.

# टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. सायली जगताप यांची वैद्यकीय अधिकारीपदी नियुक्ती ; ग्रामस्थांकडून सत्कार

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप यांची कन्या डॉ. सायली जगताप यांची वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी आष्टी तालुक्यातील टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पदभार स्वीकारला आहे. त्यांच्या या यशाबद्दल टाकळसिंग येथील समस्त ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. सायली जगताप यांचे प्राथमिक शिक्षण पहिली ते चौथीपर्यंत वस्ती शाळेत झाले. त्यानंतर पाचवी ते आठवीपर्यंत जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंग येथे शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी कन्या प्रशाला, आष्टी येथे दहावीपर्यंत




शिक्षण घेतले. अकरावी व बारावीचे शिक्षण त्यांनी लातूर येथील राजश्री शाहू कॉलेजमध्ये पूर्ण केले. महाराष्ट्राचे माजी मंत्री व मराठवाडा भूषण, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वैद्यकीय क्षेत्राची वाट निवडली. त्यानंतर डहाणू येथील एमबीबीएस महाविद्यालयात प्रवेश मिळवून त्यांनी एमबीबीएस पदवी प्रथम श्रेणीत पूर्ण केली. सध्या त्या पुढील पीजी शिक्षणासाठीही तयारी करत आहेत. आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनानुसार बीड जिल्ह्यातील रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकारी पदांसाठी अर्ज केल्यानंतर त्यांची टाकळसिंग येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. या यशाचे संपूर्ण श्रेय बद्रीनाथ जगताप यांनी आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाला दिले असून आमच्या कुटुंबाची प्रगती आ.धस यांच्या मार्गदर्शनामुळेच झाली आहे. ते आमच्या कुटुंबासाठी दैवतासारखे आहेत अशी भावना यावेळी बद्रीनाथ जगताप यांनी व्यक्त केली.

सत्कार समारंभ प्रसंगी सरपंच बलभीम वाघमोडे, चेअरमन अंगद जगताप, ग्रामविकास अधिकारी नवनाथ लोंढे, माजी सरपंच कांतीलाल जोगदंड, बाळासाहेब जगताप, संभाजी जगताप, विश्वंभर जगताप, अण्णासाहेब जगताप, लक्ष्मण कुमकर, डॉ. सुनील पठाडे, केशव जगताप, भाऊसाहेब नेटके, सखाराम बनकर, डिगांबर जगताप, मुख्याध्यापक महेश शिंदे, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सोसायटी सदस्य तसेच टाकळसिंग येथील ग्रामस्थमोठ्यासंख्येनेउपस्थितहोते.

### आ. सुरेश धस यांचे मोलाचे मार्गदर्शन ; आमच्यासाठी दैवताप्रमाणे : बद्रीनाथ जगताप

**आमदार सुरेश धस यांचे आम्हाला नेहमीच मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. माझी मुलगी डॉ. सायली जगताप हिने डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले त्या दिवसापासून ते ते स्वप्न साकार होईपर्यंत आमदार सुरेश धस यांनी आम्हाला सतत प्रेरणा, मार्गदर्शन आणि आधार दिला. केवळ राजकीय नेतृत्व नव्हे तर कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याप्रमाणे त्यांनी आमच्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून वेळोवेळी सहकार्य केले. आज माझ्या मुलीने वैद्यकीय अधिकारी म्हणून पदभार स्वीकारणे हे आमच्यासाठी अभिमानाचे क्षण आहेत. या यशामागे आमदार सुरेश धस यांचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि आशीर्वाद मोठ्या प्रमाणात लाभले आहेत. आमच्या कुटुंबाच्या प्रत्येक यशामागे त्यांचे मोलाचे योगदान असून ते आमच्यासाठी दैवताप्रमाणे आहेत, अशी भावना आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप यांनी व्यक्त केली.**

# चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसचा सलग पाच वर्षांचा NMMS परीक्षेत ऐतिहासिक विक्रम

**वडवणी । प्रतिनिधी**

चौंडेश्वरी कोचिंग क्लासेस, वडवणी यांच्या वतीने NMMS परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ व विद्यार्थी-पालक मेळावा हिंगलाज माता मंदिर, वडवणी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात सुरज टोंपे सर यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी चौंडेश्वरी कोचिंग क्लासेसच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेताना सांगितले की, क्लासेसचा विद्यार्थी गेल्या सलग पाच वर्षांपासून NMMS परीक्षेत



वडवणी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत आहे, ही बाब क्लासेससाठी अभिमानाची असून हा एक ऐतिहासिक विक्रम ठरला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर मोठे यश मिळवता येते, असे त्यांनी नमूद केले.

यानंतर क्लासेसचे पालक संजयजी तिडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशामध्ये पालक आणि शिक्षक यांच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. मुलांना सकारात्मक वातावरण, प्रोत्साहन आणि योग्य दिशा दिल्यास ते निश्चितच मोठे यश मिळवू शकतात, असे त्यांनी सांगितले. पुढे प्रा. गंगाभीष्म आंडील सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मोठे ध्येय ठेवून सातत्याने अभ्यास करण्याचे आवाहन केले. स्पर्धेच्या युगात आत्मविश्वास, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर कोणताही विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी काही विद्यार्थ्यांनी आपली यशोगाथा व्यक्त करताना शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि स्वतःची मेहनत यामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले. त्यांच्या अनुभवातून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली.

यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. अंकुश पवार सर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांनी लहानपणापासून अभ्यासाची सवय लावून वेळेचे योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. योग्य दिशा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठ्या स्पर्धांमध्ये यश मिळवू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या पुढील भागात विद्यार्थ्यांसमवेत त्यांच्या पालकांचाही सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचेही मोलाचे योगदान असते, या भावनेतून हा सत्कार करण्यात आला. त्यामुळे कार्यक्रमाला एक प्रेरणादायी आणि भावनिक स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या शेवटी संचालक तुकारामजी दिवटे सर यांनी उपस्थित मान्यवर, पालक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही अधिकाधिक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवतील, असा विश्वास व्यक्त केला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परिसरातील सुप्रसिद्ध निवेदक अमोलजी राठोड सर यांनी ओघवत्या आणि प्रभावी शैलीत केले. त्यांच्या निवेदनामुळे कार्यक्रम अधिक रंगतदार ठरला. या प्रेरणादायी कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून शिक्षणाच्या माध्यमातून मोठे यश संपादन करण्याची प्रेरणा सर्वांना मिळाली.